# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि. १० जुलै, २०२३ दुपारी ०३:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५९ वी बैठक **सोमवार, दि. १० जुलै, २०२३ रोजी दुपारी ०३:०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस सदस्य हे उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्या | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०१ ] | दि. २६ जून, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५८ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| | कुलसचिव यांनी दि.२६ जून, २०२३ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला. | |
| ठराव: | दि. २६ जून, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५८ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. | |
| | • पान क्र. ०८ व विषय क्र. ५ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | **पूर्वीचा ठराव** | |
| | रसायनशास्त्र संकुलाकडील संशोधन कामाकरिता व एम. एस्सी. भाग-२ च्या प्रकल्प कामाकरिता Electro-Chemical Workstation - ०१ नग हे शास्त्रीय उपकरण खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तथापि, सदरचे उपकरण वापरुन प्रकाशित होणारे शोधनिबंध विद्यापीठास माहितीस्तव सादर करावे व एक वर्षानंतर किती संशोधन झाले याचा अहवाल व्यवस्थापन परिषदेला द्यावा. | |
| | **दुरुस्त केलेला ठराव** | |
| | रसायनशास्त्र संकुलाकडील संशोधन कामाकरिता व एम. एस्सी. भाग-२ च्या प्रकल्प कामाकरिता Electro-Chemical Workstation - ०१ नग हे शास्त्रीय उपकरण खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तथापि, सदरचे उपकरण वापरुन प्रकाशित होणारे शोधनिबंध विद्यापीठास माहितीस्तव सादर करावे व एक वर्षानंतर किती संशोधन झाले याचा अहवाल व्यवस्थापन परिषदेला द्यावा. तसेच सदर उपकरण वापराबाबतचा पुढील तीन वर्षांचा आराखडा व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावा. | |
| | • पान क्र. ३९ व विषय क्र. २९ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | **पूर्वीचा ठराव** | |
| | FDC Limited Mumbai या कंपनीकडून शास्त्रीय उपकरणे देणगी स्वरुपात स्विकारण्यास व उपकरणे आणण्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | **दुरुस्त केलेला ठराव** | |
| | FDC Limited Mumbai या कंपनीकडून शास्त्रीय उपकरणे देणगी स्वरुपात स्विकारण्यास व उपकरणे आणण्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>परंतु, सदर उपकरणे आणण्यापूर्वी संबंधित कंपनीकडूनच या उपकरणांची सद्य:स्थिती (Working Condition) तपासून ती योग्य स्थितीत असल्यास मगच आणावीत. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०२ ] | **प्रा. गंगाधर बिराजदार, अध्यक्ष यांनी मा. कुलगुरु यांना विनंती पत्र देऊन त्याद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ शैक्षिक संघ या नावाने त्यांनी अखिल भारतीय शैक्षणिक महासंघ संलग्नित शाखा यास परवानगी देण्याबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रा. गंगाधर बिराजदार, अध्यक्ष यांनी मा. कुलगुरु यांना विनंती पत्र देऊन त्याद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ शैक्षिक संघ या नावाने त्यांनी अखिल भारतीय शैक्षणिक महासंघ संलग्नीत शाखा सुरु केलेली असल्याबाबत कळवून धर्मदाय कार्यालयाकडे नोंदणीसाठी परवानगी सादर करणे आवश्यक असल्याने विद्यापीठाकडून रितसर परवानगी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या दि.२२/१२/२००५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे राष्ट्रीय चिन्हे व नावे यांचा योग्य वापर व्हावा या संबंधी परिपत्रक काढताना त्यामध्ये राष्ट्रीय चिन्हे व नावे (गैरवापरास प्रतिबंध) १९५० चा संदर्भ देऊन सदर कायद्यातील तरतूदीनुसार शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही व्यापार, उद्योग किंवा व्यवसाय करण्यासाठी अशा कोणतेही नावाचा उपयोग करताना येणार नाही, या व इतर बाबींचा उल्लेख करून संस्थाचा नोंदीचा देखील उल्लेख केलेला आहे.<br>सबब, वर नमूद प्रमाणे अर्जात संघटनेच्या नावामध्ये प्रस्तुत विद्यापीठाचे नाव वापरण्यास संमती / सहमती / परवानगी देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापुर विद्यापीठ शैक्षिक संघ या प्रमाणे परवानगी देण्याबाबतची बाब विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | **सदर परवानगी देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली असता, संघटनेची घटना, उद्दिष्टे, रचना, सभासदत्व, धर्मादाय आयुक्तांकडे केलेला अर्ज इ. सर्व कागदपत्रांची छाननी होवून तद्नंतर परवानगीबाबत निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्याचे सर्वानुमते ठरले व समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना सर्वानुमते देण्यात आले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०३]</td><td>अधिसभा सदस्य ॲड उषा नंदकुमार पवार यांनी दि.०४/०२/२०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ नुसार विधी (Law) च्या पदवीधर विद्यार्थ्यांना Judicial Magistrate First Class (JMFC) परीक्षेबाबत विद्यापीठामध्ये मार्गदर्शन शिबीर प्रत्येक वर्षी आयोजित करावे अशी केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: अधिसभा सदस्य ॲड उषा नंदकुमार पवार यांनी दि.०४/०२/२०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव केलेला होता.<br><table><tr><td>ठराव:</td><td>विधी (LAW) च्या पदवीधर विद्यार्थ्यांना (JMFC) Judicial Magistrate First Class परीक्षेबाबत विद्यापीठामध्ये मार्गदर्शन शिबीर प्रत्येक वर्षी आयोजित करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.</td></tr></table>यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.<br><table><tr><td>ठराव:</td><td>सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास ॲड मल्लिनाथ शहाबादे व प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.</td></tr></table>सबब, अधिसभेच्या वरील ठरावानुसार अधिसभेची शिफारस विचारार्थ.</td><td>व्याख्यानमाला / तक्रार निवारण विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>विधी (Law) च्या पदवीधर विद्यार्थ्यांना Judicial Magistrate First Class (JMFC) परीक्षेबाबत विद्यापीठामध्ये मार्गदर्शन शिबीर प्रत्येक वर्षी आयोजित करावे अशा अधिसभेने केलेल्या शिफारशीबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला:-<br>विधी (Law) च्या Judicial Magistrate First Class (JMFC) परीक्षेबाबत विद्यापीठाशी संलग्नित विधी महाविद्यालयांमध्ये आळीपाळीने दरवर्षी खालीलप्रमाणे शिबीर आयोजित करावे.<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>महाविद्यालयाचे नाव</th><th>शैक्षणिक वर्ष</th></tr><tr><td>१)</td><td>दयानंद विधी महाविद्यालय, सोलापूर</td><td>२०२३-२४</td></tr><tr><td>२)</td><td>राजर्षि शाहू महाराज विधी महाविद्यालय, बार्शी</td><td>२०२४-२५</td></tr><tr><td>३)</td><td>कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपूर</td><td>२०२५-२६</td></tr></table></td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०४] | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>**(सहपत्रे स्वतंत्रपणे सादर करण्यात येतील)**<br>टिपणी: अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव | **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[५(१)]</td><td>मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका कॅप व महाविद्यालय या व्यतिरिक्त इतर ठिकाणी तपासणी करीता ८० मार्कांचे प्रति ४० पेपर आणि ४० मार्कांचे प्रति ६० पेपर नियमानुसार परीक्षकांनी तपासलेल्या परीक्षकांना बैठक भत्ता (Seating Allowance) रक्कम रु. २००/- देण्याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.</td><td>परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग</td></tr>
<tr><td></td><td>टिपणी: मार्च / एप्रिल २०२३ परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करण्यासाठी १७ महाविद्यालयांना On Screen Evaluation Centre / मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र म्हणून जाहीर करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयातील/संकुलातील शिक्षकांनी On Screen Evalution केंद्रावर जाऊन/महाविद्यालयातील संगणकावरुन तसेच जेथे सोईस्कर होईल तेथून शिक्षकांनी सुरक्षितता, गोपनीयता राखून उत्तरपत्रिकांचे On Screen Evalution करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर उत्तरपत्रिका तपासण्याचे काम वेळेत पुर्ण करण्याबाबतच्या सुचना संबंधित शिक्षक (Examiner & Moderator) यांना दयाव्यात असे संदर्भ पत्र क्र. PAHSUS/EXAM/२०२३/१४०७, दि.२३/६/२०२३ अन्वये सर्व संकुले व सर्व संलग्नित पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.
<table>
<tr><td>विषय क्र. ५</td><td>मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन (On Screen Evaluation) शिक्षकांनी On Screen Evaluation केंद्रावर जाऊन / महाविद्यालयातील कार्यालयीन संगणकावरुन तसेच शिक्षकांनी सुरक्षितता, गोपनीयता राखून जेथे सोईस्कर होईल तेथून उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करण्याची बाब परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ५</td><td>मार्च / एप्रिल २०२३ परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन (On Screen Evaluation) शिक्षकांनी On Screen Evaluation केंद्रावर जाऊन / महाविद्यालयातील संगणकावरुन तसेच जेथे सोईस्कर होईल तेथून शिक्षकांनी सुरक्षितता, गोपनीयता राखून उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td></tr>
</table>
मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका सोईस्कर होईल तेथून शिक्षकांनी सुरक्षितता, गोपनीयता राखून उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करण्यात मान्यता देण्यात आलेली असल्याने शिक्षकांना इंटरनेट चार्जेस देण्याबाबतचा विषय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला असता सदर बैठकीमध्ये "कॅप व महाविद्यालय या व्यतिरीक्त इतर ठिकाणी उत्तरपत्रिका तपासणीकरिता ८० मार्कांचे प्रति दिवस ४० पेपर आणि ४० मार्कांचे प्रति दिवस ६० पेपर नियमानुसार परीक्षकांनी तपासलेल्या परीक्षकांना बैठक भत्ता (Seating Allowance) रक्कम रु. २००/- देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आलेली आहे."<br>
सबब परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.</td><td></td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका कॅप व महाविद्यालय या व्यतिरिक्त इतर ठिकाणी तपासणी करीता ८० मार्कांचे प्रतिदिवस ४० पेपर आणि ४० मार्कांचे प्रतिदिवस ६० पेपर नियमानुसार तपासलेल्या परीक्षकांना बैठक भत्ता (Seating Allowance) आपापल्या महाविद्यालयात अथवा परीक्षकांनी स्वत:च्या घरी पेपर तपासले तर रक्कम रु. २००/- देण्याचे तसेच इतर महाविद्यालयात जाऊन पेपर तपासले तर रक्कम रु.४०० देण्याबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(२)] | **आंतरराष्ट्रीय पातळीवरचा सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यासाठी व शासनाकडून तसेच खेलो इंडियाकडून निधी प्राप्त करण्यासाठी तसेच शासनाकडे प्रलंबित असलेल्या व विकास कामासाठी निधीबाबत पाठपुरावा करणेकामी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.** | क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळ |
| | टिपणी: सोलापूर जिल्ह्यामध्ये असलेल्या उदयन्मुख राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स खेळाडूंसाठी अद्यापपर्यंत एकही सिंथेटिक ट्रॅक नसल्याने या सुविधेसाठी खेळाडू नाशिक तसेच विजापूर व बालेवाडी येथे सरावासाठी जातात. यासाठी लागणारा खर्च व वेळ अधिकचा जात असल्याने खेळाडूंना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सध्या आपल्या विद्यापीठाचा खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र आहे मात्र सरावासाठी मैदान नसल्याने तो सध्या नाशिक येथे सराव करत आहे, आपल्या विद्यापीठाच्या तसेच जिल्ह्यातील खेळाडूंच्या सुविधेचा विचार करता आपल्याकडे असलेल्या ट्रेकला सिंथेटिक करता येऊ शकते, त्यांनी यासाठी खेलो इंडिया तसेच क्रीडा विभागाकडे चौकशी केली आहे, मात्र यासाठी प्रोजेक्ट तयार करुन निधी आणणेसाठी तसेच तो पूर्ण होणेपर्यंत पाठपुरावा करण्यासाठी, सध्या आपल्याकडे सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय मल्टीपर्पज हॉल च्या कामकाजामध्ये लक्ष तसेच उर्वरित निधीसाठी पाठपुरावा करण्यासाठी तीन सदस्यांची समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **आंतरराष्ट्रीय पातळीवरचा सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यासाठी व शासनाकडून तसेच खेलो इंडियाकडून निधी प्राप्त करण्यासाठी तसेच शासनाकडे प्रलंबित असलेल्या व विकास कामासाठी निधीबाबत पाठपुरावा करणेकामी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.** | |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. सचिन मारुती गायकवाड | अध्यक्ष |
| २. | संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ | सदस्य |
| ३. | क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळ विभागातील कर्मचारी | सहाय्यक |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(३)] | विद्यापीठाच्या विविध विभागात आजपर्यंत घेण्यात आलेल्या शैक्षणिक उपयोगी मशिनरींच्या, उपकरणांच्या देखभाल, व्यवस्थापनाबाबत माहिती मिळण्याची बाब विचारार्थ. | शास्त्रीय उपकरण केंद्र व सर्व संकुले |
| | टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व संशोधनात्मक कार्यासाठी लाखो रुपयाची उपकरणे आजपर्यंत विद्यापीठाने खरेदी केली आहेत, ती कोणकोणत्या विभागात कोणत्या स्थितीत आहेत व ती किती आहेत, कोणत्या स्थितीत आहेत, त्यावरती आजपर्यंत किती रक्कम खर्च झाली आहे.<br>सबब, याबाबत सविस्तर अहवाल मिळण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | विद्यापीठाच्या विविध विभागात आजपर्यंत घेण्यात आलेल्या शैक्षणिक उपयोगी मशिनरींच्या, उपकरणांच्या देखभाल, व्यवस्थापनाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडील उपकरण वापराबाबतच्या मार्गदर्शक सूचीमध्ये सदर बाब समाविष्ठ आहे.<br>तसेच सर्व शैक्षणिक संकुले व शास्त्रीय उपकरण केंद्र येथील उपलब्ध असलेली सर्व शास्त्रीय उपकरणे उपयोगात आहेत अथवा नाहीत याबाबत तपासणी करुन अहवाल देण्यासाठी समिती गठीत करावी व समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदयांना देण्याचे सर्वानुमते ठरले. | |

प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [५(४)] | **प्रस्तुत विद्यापीठाचा १९ व्या वर्धापन दिनी देण्यात येणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारासाठी नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.** | कुलसचिव कार्यालय |
| | टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचा १९ व्या वर्धापन दिन दि.०१ ऑगस्ट, २०२३ रोजी संपन्न होणार आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनी विविध पुरस्कार प्रदान केले जातात. त्यापैकीच जीवनगौरव या पुरस्कारासाठी आदर्श नियम तयार करण्यात आले असून त्यामध्ये नियम क्र. ७ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.<br>१. एखाद्या योग्यताप्राप्त व्यक्तीची परीपूर्ण अर्जासह/कागदपत्रांसह शिफारस इतर व्यक्तीला करता येईल.<br>२. त्या व्यक्तीला स्वत: अर्ज करता येईल.<br>त्यानुसार मा. प्रभारी कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या समितीने मा. उदय उमेश लळीत, माजी सरन्यायाधीश, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे जीवनगौरव पुरस्कारासाठी नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेसमोर केले. मा. उदय लळीत यांचा जन्म सोलापूर येथे झाला असून त्यांनी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून काम पाहिले आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाचा १९ वा वर्धापन दिनी देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार हा मा. उदय उमेश लळीत यांना देण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाचा १९ व्या वर्धापन दिनी देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार हा माजी सरन्यायाधीश मा. उदय उमेश लळीत यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. प्रभारी कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

21.7.23
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद